● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३९ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

yuva.aadarsh@gmail.com
RNI: MAHMAR/2019/78282

# युवा आदर्श

https://www.facebook.com/yuvaaadarshnews/
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो. ८३९००९८८८६
गुरुवार, दि २९ ऑगस्ट २०२४
https://yuvaadarsh.com

# हर घर योद्धा अभियान!

### रोटरी क्लब जालना मिडटाऊनचा उपक्रम; शाळा, कॉलेजमधील मुलींना देणार स्वसंरक्षणाचे धडे




**जालना । प्रतिनिधी -** बदलापूर, कोलकातासह इतर ठिकाणच्या महिला अत्याचाराचा घटना पाहता, प्रत्येक घरातील मुलीला योद्धा बनविण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी सौ.संगीताताई गोरंट्याल यांच्या संकल्पनेतून रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनतर्फे प्रत्येक शाळा, कॉलेज आणि कोचिंग क्लासेसमधील मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. यासाठी जालना पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा व दामिनी पथकाचे सहकार्य लाभणार आहे.

बदलापुर, कोलकाता येथील घृणास्पद घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी कॅण्डल मार्च, निषेध मोर्चा ठीक आहे. मात्र, अशा घटना घडूच नयेत, यासाठी प्रत्येक मुलीला स्वसंरक्षणाचे धडे दिले तर विपरीत परिस्थितीत त्या समर्थपणे तोंड देऊ शकतील, या दृष्टीने मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले जावेत, अशी संकल्पना माजी नगराध्यक्ष सौ. संगीताताई यांनी मांडली आणि तयारी असेल तर आपण सर्वतोपरी सहकार्य करू, असे सांगितले असता, रोटरी क्लब जालना मिडटाऊनने 'हर घर योद्धा' हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक शाळा, कॉलेज, कोचिंग क्लासेस या ठिकाणी मार्शल आर्ट्स टीम मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देणार आहे. इतर सेवाभावी आणि सामाजिक संघटनांनीही आमच्या या उपक्रमात सहभाग नोंदविल्यास हर घर योद्धा या संकल्पनेला बळ मिळेल, विश्वास रोटरी मिडटाऊनतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

बऱ्याचदा स्त्री अत्याचाराच्या घटना घडतात. छेडछाड, मंगळसूत्र हिसकावण्याच्या, विनयभंग किंवा अतिप्रसंगाचे प्रकार घडतात. एखादा प्रसंग आलाच तर महिला, मुलींना स्वतःचे संरक्षण करता आले पाहिजे. न घाबरता त्या पान ३ वर

#### सामाजिक संस्थांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन

मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देणाऱ्या या उपक्रमात रोटरी परिवारासोबत इन्नरव्हील, रोटरॅक्ट, सखी ग्रुप, लॉयन्स, अद्विक क्लबसह जालना शहरातील सर्व सामाजिक संघटनांनी सहभागी होऊन 'हर घर योद्धा' या संकल्पनेला बळ द्यावे. सर्वांनी मिळून पोलिस आणि दामिनी पथकाच्या सहकार्याने एकत्रितपणे ही मोहीम व्यापक प्रमाणात राबूया, अशी साद रोटरी क्लब जालना मिडटाऊनच्यावतीने घालण्यात आली आहे.

# अशैक्षणिक कामातून शिक्षकांना सूट द्या

### मराठवाडा शिक्षक संघातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी यांना मराठवाडा शिक्षक संघ जिल्हा जालना यांच्या कडून मा. उपजिल्हाधिकारी जालना तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी जालना यांना निवेदन देण्यात आले निवेदनात खालील बाबतीत चर्चा करण्यात आली.

अशैक्षणिक कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे. बि. एल. ओ. च्या कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे. मागील बि. एल. ओ. चे मानधन अदा करण्यात यावे. ५५ वर्षे वय असलेल्या शिक्षकांना निवडणूक कामातून वगळण्यात यावे. महिला कर्मचारी ना निवडणूक कामातून वगळण्यात यावे. कर्मचारीना स्वतः मतदानाचा हक्क बजावण्यासाठी दिलेल्या निवडणूक मतदान केंद्रावर उपलब्ध करण्यात यावे.

खाजगी शिक्षक संस्थातील शिक्षकांना निवडणूक डिव्टी कार्याध्यक्षाची जबाबदारी म्हणून देण्यात येऊ नये.

अशी चर्चा उपजिल्हाधिकारी निवडणूक अधिकारी हदगल साहेब यांच्या समवेत करण्यात आली. आपल्या मागण्या संदर्भात सकारात्मक दृष्टीकोन ठेवले. तात्काळ या बद्दल एक बैठक बोलावून निर्णय घेण्यात येईल. असे अभिवचन देण्यात आले. सद्यस्थितीत भविष्यात विधानसभा निवडणुकीतील कामाचा व्याप आहे. सर्व गोष्टी वर सखोल चर्चा झाली.या वेळी मराठवाडा शिक्षक संघ चे केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे सर जिल्हा कार्याध्यक्ष सय्यद फरखुंद अली बट्टेवार सर व इतर प्रवेक्षक व बि.एल.ओ.मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाहनांच्या 'हेडलाईट'मध्ये नियमबाह्य बदल करणाऱ्यांवर कारवाईचे परिवहन अधिकाऱ्यांना आदेश!

### 'सुराज्य अभियाना'च्या तक्रारीचा परिणाम ! प्रत्यक्षात कारवाई व्हावी, अन्यथा न्यायालयात जाऊ

**नाशिक । प्रतिनिधी -** वाहनांच्या हेटलाईटची प्रकाशकिरणे कशी असावीत ? याविषयी 'केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९' अंतर्गत मानके निश्चित करण्यात आली आहेत. याला डावलून काही वाहनचालक गाड्यांच्या हेटलाईटमध्ये डोळ्यांना त्रासदायक लाईट बसतात. त्याम धील त्रासदायक प्रकाशकिरणांम ुळे राज्यात अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. यात काहीजणांना स्वत:चा प्राणही गम वावा लागला. सुराज्य अभियानाने याचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्याच्या परिवहन आयुक्तांकडे तक्रार केली होती. याची नोंद घेऊन २३ ऑगस्ट या दिवशी परिवहन आयुक्तांनी या प्रकरणी कारवाई करून अहवाल सादर करण्याचा आदेश राज्यातील सर्व प्रादेशिक आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकार्यांना दिला आहे, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'चे महाराष्ट्र राज्य सम न्वयक श्री. अभिषेक मुरुकटे यांनी दिली आहे.

वाहन चालवतांना चालकाचे डोळे समोरील वाहनाच्या हेडलाईटच्या प्रकाशकिरणांमुळे दीपले जाऊ नयेत, यासाठी 'केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९'च्या अंतर्गत केंद्रशासनाने वर्ष २००५ मध्ये सुरक्षा म नकांमध्ये आवश्यक सुधारणा केल्या आहेत. प्रत्यक्षात यानुसार कार्यवाही होत नसल्याचे सुराज्य अभियानाच्या लक्षात आल्यामुळे परिवहन आयुक्तांकडे याविषयी तक्रार केली होती. या तक्रारीवरून परिवहन आयुक्तांनी आदेश दिले आहेत. हेडलाईटमध्ये नियमबाह्य पालट करणार्या वाहनांची पडताळणी करून दोषी वाहनचालकांवर कारवाई करावी, तसेच याविषयी जनजागृती करावी, असेही परिवहन आयुक्तांनी परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व प्रादेशिक आणि उपप्रादेशिक अधिकार्यांना कळवले आहे, असे श्री. मुरुकटे म्हणाले.

**प्रत्यक्षात कारवाई व्हावी, अन्यथा न्यायालयात जाऊ !**

खरे तर मोटार वाहन कायद्याम ध्ये दोषींवर कारवाईची तरतूद असूनही परिवहन विभाग गांभीर्याने कारवाई करत नाही, असे आढळून आल्यामुळे आम्हाला परिवहन आयुक्तांकडे तक्रार करावी लागली आहे. परिवहन आयुक्तांनी प्रादेशिक आणि उपप्रादेशिक अधिकार्यांना केवळ आदेश देऊन न थांबता



या प्रकरणी खरोखरच कारवाई होत आहे ना ? याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. यामुळे राज्यातील अनेकांचे प्राण वाचतील. यावर कार्यवाही झाली नाही, तर या प्रकरणी आम्हाला न्यायालयात जावे लागेल, असा इशाराही श्री अभिषेक मुरुकटे यांनी दिली आहे.

## युवा आदर्श स्मारक भग्न ...

समाजकंटक कुणी
स्मारका करी भग्न
नाचाया थया थया
तत्पर असतात नग्न
शासन चालले छान
आयते आले विघ्न
ढोल ताशे वाजवा
चल रे मोडाया लग्न
कशाला उगा काम
होती सगळे उद्विग्न
डोळे मिटे प्रशासन
आपले मस्तीत मग्न
तपास बसावे करत
कोण कुणा संलग्न
आगीचे बंब येईतो
बेचिराख करी अग्न
अस्मितेला लागेचूड
परंपरे दिला भडाग्न
काळेकृत्य काळिमा
मूळ हेतूला चिताग्न
सत्ताधारी विरोधक
वाद विवादा विमग्न
संरक्षणा ऐशी तैशी
यंत्रणा बनते विनग्न
पळाया लागले ससे
कोसळे खाली गगन
शांत मग आपोआप
सगळे स्वतात मगन

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**

# श्रीकृष्ण भारूका यांचे पत्रकारितेतील योगदान महत्वाचे - डॉ. भगवान दिरंगे

### श्रीकृष्ण भारूका यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**परतूर । प्रतिनिधी -** स्व.पत्रकार तथा सा. भूकंपचे संस्थापक संपादक श्रीकृष्ण भारूका यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांचे प्रश्न सोडविले.अतिशय प्रतिकूल परिस्थितीत साप्ताहिक चालवले. त्यामुळे पत्रकारितेत त्यांचे योगदान महत्वाचे आहे असे प्रतिपादन निवृत्त



प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे यांनी केले. सा. भूकंप कार्यालयात सोमवारी सायंकाळी शहरातील पत्रकारांच्या वतीने स्व.श्रीकृष्ण भारूका यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रम ुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

डॉ.दिरंगे पुढे म्हणाले की,स्व. श्रीकृष्ण भारूका यांनी समाजसेवा करता यावी या उदात्त भावनेतून पत्रकारितेचे व्रत स्विकारले. काही दैनिकांमधून परतूर प्रतिनिधी म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी सा. भूकंपचा श्रीगणेशा पान ३ वर

# विधानसभा निवडणुक; तिसऱ्या आघाडीचे संकेत

### येत्या १५ दिवसात निर्णय जाहीर करु- बच्चु कडू

**मुंबई -** राज्यात एकीकडे आगामी विधानसभा निवडणुकांचे वेध लागले असताना दुसरीकडे महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. राज्यातील महिला अत्याचाराच्या घटना आणि सिंधुदुर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यावरुन राज्यातील राजकारण तापलं आहे. महाविकास आघाडीकडून राज्य सरकारला धारेवर धरलं जात आहे, तर अशा घटनांचे विरोधकांनी राजकारण करु नये, असे सत्ताधारी म्हणत आहेत. तर, मराठा उपोषणकर्ते मनोज जरांगे यांनी निवडणूक लढवण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तिसरी आघाडी उभारली जाते की काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे आणि प्रहारचे बच्चू कडू यांची भेट झाली. या भेटीनंतर प्रतिक्रिया देताना १५ दिवसांत तिसऱ्या आघाडीचा निर्णय जाहीर करू, असे बच्चू कडू यांनी म्हटलं आहे.

छत्रपती संभाजीराजे यांच्यासमवेत माझी चर्चा झाली, मी एक कार्यकर्ता म्हणून संभाजीराजेंसोबत आहे. देशातील आर्थिक विषमता दूर पान ३ वर

# २० वर्षांनंतर लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**परतूर । प्रतिनिधी -** लाल बहादूर शास्त्री विद्यालय परतूर या शाळेचे तब्बल २० वर्षांनंतर सन २००४ ची बॅच तब्बल वीस वर्षांनी एकत्र येऊन बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

लाल बहादुर विद्यालय या शाळेचे तब्बल २० वर्षांनंतर सन २००३-२००४ ची जुनी एस. एस. सी. (१० वी ब) बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा परतुर येथील कृष्णमूर्ती हॉटेल सांस्कृतिक हॉलमध्ये झाला.

यावेळी शालेय जीवनातील आठवणींना सर्वांनी उजाळा दिला. काहींनी आपल्या आनंदाश्रूंना वाट मोकळी करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संजय जाधव हे होते.

आपले वय, पद, प्रतिष्ठा, कामाचा व्याप बाजूला ठेवून २० वर्ष झुकलेले हे सर्व माजी विद्यार्थी अगदी उत्साहाने एकत्र जमले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. अनेक वर्षांनंतर आपण एकत्र भेटत आहोत. त्यामुळे ओळख लागते की नाही ही मनातील भावनाही होतीच; पण एकत्र आले आणि सर्वांनीच गळाभेट घेतली.

कार्यक्रमाचे नेटके संयोजन सर्व माजी विद्यार्थी यांनी केले यावेळी मुख्याध्यापक संजय जाधव, श्री पाटील, श्री सारस्वत, श्री खुरपे, श्री कोरके, श्री राऊत, श्रीमती लड्डा, श्रीमती सरोदे आदी शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींनी अथक परिश्रम घेतले.

# आण्णाभाऊ साठेंचा लढा नव्याने लढण्याची गरज; प्रस्थापिताविरोधात पेटून उठा - सतीश घाटगे

## लहूजी सेनेचा जिल्हास्तरीय मेळावा: विधानसभा निवडणुकीत घाटगे यांना पाठींबा

**जालना । प्रतिनिधी -** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर आणणाभाऊ साठे यांच्यासह सर्व बहुजनांच्या महापुरुषाना अभिप्रेत असलेली दलित-वंचित-बहुजन समाजाची प्रगती आणि विकास अजूनही झालेला नाही. आजही मातंग आणि बहुजन समाज मुख्य प्रवाहात आलेला नाही.म्हणून दलित-वंचित-बहुजन समाजाचा केवळ राजकारणासाठी वापर करणाऱ्या प्रस्थापित राजकारण्यांना जागा दाखवून येणाऱ्या काळात परिवर्तन घडवा, असे आवाहन भाजपा नेते सतीश घाटगे पाटील यांनी बहुजन समाजाला केले.

जालना तालुक्यातील विरेगाव येथे लहूजी सावळे बहुजन क्रांती सेनेचे अध्यक्ष राधाजी शेळके, उपाध्यक्ष गणपतजी कांबळे व भाजपा नेते तथा घनसावंगी विधानसभेचे निवडणूक प्रमुख सतीश घाटगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मातंग व बहुजन समाजाचा जिल्हा स्तरीय मेळावा पार पडला या मेळाव्यात ते बोलत होते.

लोकशाहीर, साहित्यसम्राट आणणाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीगृरू लहूजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने हा मेळावा आयोजित केला होता.यावेळी घाटगे पाटील यांनी समाज बांधवासोबत संवाद साधला. दलित-वंचित-बहुजन समाजाचा प्रस्थापितांनी केवळ राजकारणासाठी वापर केला. त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवलं आहे. आजही मातंग आणि बहुजन समाज समाजाच्या मुख्य प्रवाहात आलेला नाही. म्हणून प्रस्थापितांना या निवडणुकीत जागा दाखवून आपल्या पुढच्या पिढीच्या भविष्यासाठी परिवर्तनाला साथ देण्याचे आवाहन केले.



वंचित, दलितांच्या न्याय- हक्कासाठी आणि बहुजन समाजाच्या हितासाठी येणाऱ्या काळात घनसावंगी विधानसभेत समाजाच्या विकासाचे व्हिजन असलेल्या सतीश घाटगे पाटील यांनाच बहुजन समाज साथ देणार असा विश्वास राधाजी शेळके, गणपतजी कांबळे यांनी दिला.

या मेळाव्यास लहूजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे युवा नेते शिवबाजी शेळके, मराठवाडा सचिव बाबासाहेब पाटोळे उपाध्यक्ष रमेश दाभाडे,महिला आघाडीच्या मराठवाडा अध्यक्ष कासाबाई शिर्गुळे,चंद्रकला गवळी,सर्जेराव पाटोळे यांच्यासह सर्व पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेनेचे उपशहर प्रमुखपदी मनोज देवरे यांची नियुक्ती



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रवादीतून शिवसेनेत दाखल झालेले मनोज देवरे यांची माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते नियुक्ती करण्यात आली आहे यावेळी प्रमुख उपस्थिती शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुनराव खोतकर शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शिवसेना संपर्क नेते पंडित दादा भुतेकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले शिवसेना शहर संघटक दिनेश भगत आदींची प्रमुख उपस्थिती होती. नियुक्तनंतर किशोर शिंदे रामसिंग घडे.रामेश्वर कुरील संतोष ओके आदेश देवरे यश भालेकर ओम सलामपुरे राम घडे सागर घडे अर्जुन देवरे बाळू पवार सुभाष गिराम दीपक परदेशी सुधाकर निर्वे संजय मुळे सतीश भुरेवाल ओम सलामपुरे प्रकाश घोडे मुकेश देवरे सुमित देवरे. रितेश घडे सचिन मुंगसे आदींनी शुभेच्छा दिल्या आहे






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.